झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा./सप्रा ३/सदाशिव पेठ/१३१८/२०२१
दिनांक : १२/ १०/२०२१.

# अंतिम पात्रता यादीचे जाहीर प्रकटन

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत प्रकटनात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे" या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांनी पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नमूद पेठ सदाशिव पेठ, स.नं.१३५, फा.प्लॉ.क्र.२८ वरील अंबिल ओढा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी क्र. झोपुप्रा/सप्रा/कावि/२८ अंबिल ओढा/१६९/२०१७ दि.२२/०३/२०१७ अन्वये प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटन प्रसिध्द केलेले आहे; आणि

ज्याअर्थी, या प्रकटनास अनुसरुन शासनाच्या निर्णय व आदेशान्वये उक्त झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची यादी तयार करणेत आली असुन, झोपडीधारकांना त्यांची निवासी / बिगरनिवासी/ संयुक्त पात्रता निश्चित करणेसाठी जोडपत्र-३/४ व पुराव्यांसह कागदपत्रे सादर करणेबाबत कळविणेत आले असुन, सदरच्या झोपडीधारकांचे उक्त जोडपत्र व पुराव्यांसह कागदपत्रे प्राधिकरणांस प्राप्त झालेली आहेत; आणि

ज्याअर्थी, प्राप्त झालेले जोडपत्र व त्यासोबतचे प्रपत्र आणि पुराव्यांची छाननी करुन खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नमूद पेठ सदाशिव पेठ, स.नं.१३५, फा.प्लॉ.क्र.२८ वरील अंबिल ओढा वरील या २४५४४.२३ चौ.मी. क्षेत्रातील झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी व परिशिष्टाचा गोषवारा तयार करण्यात आला असुन, ही प्राथमिक पात्रता यादी जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/१३५-सदाशिव पेठ /१४१०/२०१७ दि.१०/११/२०१७ रोजीच्या जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्द करणेत आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त प्राथमिक पात्रता यादीबाबत हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी आपल्या हरकती / दावे /सूचना / आक्षेप पुराव्यांसह लेखी स्वरुपात सादर करणेस कळविले असता विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/ सूचना / दावे/ आक्षेप विचारात घेऊन तसेच संबंधितांना सुनावणीची संधी देऊन व त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन आणि पुराव्यांची पडताळणी करुन सदरची प्राथमिक पात्रता यादी अंतिम करणेत आली आहे;

त्याअर्थी, अंतिम करणेत आलेली प्राथमिक पात्रता यादी या प्रकटनाद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे. या यादीमध्ये समावेश असलेल्या कोणत्याही नावाबाबत कोणताही आक्षेप असलेस तो पुराव्यासह उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेकडे सादर करता येईल. परंतू उपरोक्त अंतिम पात्रता यादीमध्ये अपात्र असणाऱ्या झोपडीधारकास पात्रतेकरीता उक्त

अधिनियमाच्या कलम ३५(१) अन्वये मा. सचिव, झो.पु.प्रा., पुणे यांचेकडे यादी प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत प्रथम अपील दाखल करता येईल. मा. सचिव, झो.पु.प्रा., पुणे यांचेकडून प्रथम अपिलावर निर्णय देण्यात आल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३५(१अ) अन्वये निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. विभागीय तक्रार निवारण समिती, जुने विधानभवन, पुणे १ यांचेकडे पात्रतेकरीता द्वितीय अपील दाखल करता येईल. पात्रतेसंबंधात मा. विभागीय तक्रार निवारण समिती यांनी दिलेला निर्णय अंतिम राहिल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** स.नं.१३५, फा.प्लॉ.क्र.२८, अंबिल ओढा, सदाशिव पेठ, पुणे.
**महानगरपालिका क्षेत्र :** पुणे महानगरपालिका.

| पेठ | स.नं. | क्षेत्र ( चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|
| सदाशिव पेठ | स.नं.१३५, फा.प्लॉ. क्र.२८ | २४५४४.२३ चौ. मी. | पुर्वेस - शिवाजी सोसायटी<br>पश्चिमेस - फा.प्लॉ.२८(पै)<br>दक्षिणेस - नियोजित नाला<br>उत्तरेस - रस्ता | |

स्थळ:- झो.पु.प्रा. पुणे
दि.१२/१०/२०२१

सक्षम प्राधिकारी क्र.३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे